दैनिक

मनोरंजनासह प्रबोधनासाठी...

epaper.rayatsamachar.com

# रयत समाचार

खिचों न कमानों को, न तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो - अकबर इलाहाबादी

संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक

• RNI No. MAHMAR/2011/40847 • वर्ष १३ वे • अंक ४२५ वा • गुरुवार, ता. ९ ऑक्टोबर २०२५ • www.rayatsamachar.com • पाने ४ • मूल्य रु. ४.००


## नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे नरेंद्र मोदींच्या हस्ते लोकार्पण!

**मुंबई | रयत समाचार**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या (NMIA) पहिल्या टप्प्याचे भव्य उद्घाटन करण्यात आले. उरण तालुक्यातील उलवे परिसरात उभारलेले हे विमानतळ मुंबई महानगर प्रदेशाच्या विकासाला नवसंजीवनी देणार असून, भारतातील सर्वात आधुनिक आणि तंत्रज्ञानाधिष्ठित विमानतळ म्हणून ते ओळखले जाणार आहे. सुमारे १९,६५० कोटी रुपयांचा खर्च असलेला हा प्रकल्प सार्वजनिक-खाजगी भागीदारीत (PPP) उभारण्यात आला आहे. याचे बांधकाम आणि व्यवस्थापन अदानी समूहाच्या 'नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ लिमिटेड' या कंपनीमार्फत करण्यात आले आहे. विमानतळाचे डिझाइन




जगप्रसिद्ध Zaha Hadid Architectsयांनी तयार केले असून, टर्मिनलची वास्तुरचना भारतीय संस्कृती आणि आधुनिक तंत्रज्ञान यांचा संगम दर्शवते. या पहिल्या टप्प्यात दरवर्षी २० दशलक्ष प्रवाशांची क्षमता असलेले टर्मिनल सुरू करण्यात आले असून, पुढील टप्प्यांनंतर एकूण ९० दशलक्ष प्रवासी क्षमतेचा हा विमानतळ बनेल. विमानतळ परिसर सुमारे १,१६० हेक्टर क्षेत्रात पसरलेला आहे. येथे चार धावपट्ट्या, अत्याधुनिक हवाई वाहतूक नियंत्रण टॉवर, आणि मल्टी-मोडल ट्रान्सपोर्ट हब विकसित केला जाणार आहे. उद्घाटन प्रसंगी बोलताना पंतप्रधान मोदी म्हणाले, ''नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ केवळ महाराष्ट्रासाठीच नव्हे, तर संपूर्ण भारताच्या आर्थिक उड्डाणाचे प्रतीक ठरणार आहे. मुंबईच्या विद्यमान विमानतळावरील गर्दी कमी होऊन देश-विदेशातील गुंतवणुकीस नवे दरवाजे उघडतील.'' विमानतळाची थेट जोडणी मुंबई ट्रान्स हार्बर लिंक, सीऑन-पनवेल महामार्ग, तसेच भावी मेट्रो मार्गांशी केली जाणार आहे. इंडिगो, अकासा एअर, आणि एअर इंडिया एक्सप्रेस यांसारख्या कंपन्यांकडून डिसेंबर २०२५ पासून व्यावसायिक उड्डाणे सुरू करण्याची तयारी सुरु आहे. राज्य सरकारच्या मते, या प्रकल्पामुळे हजारो स्थानिकांना रोजगार उपलब्ध होईल आणि शेतमाल, मत्स्यव्यवसाय तसेच औद्योगिक उत्पादनांच्या निर्यातीस मोठा हातभार लागेल. या उद्घाटनास महाराष्ट्राचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, नागरी विमान वाहतूक मंत्री, तसेच अडानी समूहाचे गौतम अदानी आणि विविध उद्योगक्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

## पुढचा हल्ला दलित आयएएस, डॉक्टरांवर होऊ शकतो

### प्रकाश आंबेडकर यांचा इशारा

**मुंबई | रयत समाचार**

भारताचे सरन्यायाधीश न्यायमूर्ती बी.आर. गवई यांच्यावर झालेल्या हल्ल्याने देशभरात खळबळ उडाली असताना, वंचित बहुजन आघाडीचे नेते ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी या घटनेवर तीव्र प्रतिक्रिया दिली आहे. हा फक्त एक हल्ला नाही, तर देशात वाढणाऱ्या जातीय द्वेषाचा खुला इशारा आहे, असे ते म्हणाले. आंबेडकर यांनी आपल्या (पूर्वी ट्विटर) हँडलवर लिहिले की, जातीय अत्याचार पूर्वी ग्रामीण भागातच उघडपणे होत होते. शहरांमध्ये तो एका मुखवट्यामागे लपलेला असे कार्यालये, रुग्णालये आणि सरकारी संस्थांच्या चार भिंतींमध्ये. पण आता त स




राहिलेले नाही. ते पुढे म्हणाले, जर सर्वोच्च संवैधानिक पदावरील व्यक्तीलाच जातीच्या आधारावर लक्ष्य केले जात असेल, तर देशातील दलित आयएएस अधिकारी, डॉक्टर, प्रशासकीय अधिकारी सुरक्षित कसे राहतील? प्रकाश आंबेडकर यांनी ठाम शब्दांत इशारा दिला, हा एक अपघाती प्रकार नाही, तर एक संदेश आहे! पुढचा हल्ला दलित आयएएस अधिकारी, डॉक्टर आणि सरकारी अधिकाऱ्यांवर होऊ शकतो. त्यांच्या या वक्तव्यामुळे सामाजिक आणि राजकीय वर्तुळात तीव्र चर्चा रंगली आहे. देशातील जातीय तणावाच्या वाढत्या पार्श्वभूमीवर आंबेडकर यांचा हा इशारा गंभीर इशारा मानला जात आहे.

## 'गांधी वध नाही, गांधी खून' अखेर महाराष्ट्र विश्वकोशात सुधारणा;

### नागपूरचे संपादक कोंडबत्तुनवार यांना यश

**नागपूर | रयत समाचार**



नागपूरचे ज्येष्ठ पत्रकार आणि संपादक प्रभाकर कोंडबत्तुनवार यांच्या पाच वर्षांच्या अथक प्रयत्नांना अखेर यश आले आहे. महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश मंडळाने आपल्या डीजिटल आवृत्तीत ऐतिहासिक सुधारणा करत ''गांधी वध'' हा शब्द बदलून ''गांधी खून'' असा अचूक आणि संवेदनशील उल्लेख केला आहे. कोंडबत्तुनवार यांनी दीर्घकाळ पाठपुरावा करून महात्मा गांधींच्या हत्येस 'वध' नव्हे तर 'खून' म्हणावे, अशी मागणी सातत्याने केली होती.



अखेर विश्वकोश मंडळाने त्यांच्या भूमिकेचा स्वीकार करत 'भारतीय जनता पक्ष' व 'राष्ट्रीय स्वयंसेवक संघ' या प्रविष्ट्यांतील मजकुरात आवश्यक दुरुस्त्या केल्या आहेत. पूर्वी लिहिले होते : १९४८ मध्ये महात्मा गांधींच्या वधानंतर सरकारने राष्ट्रीय स्वयंसेवक संघ व हिंदू महासभा या दोन्ही संघटनांवर बंदी घातली. आता दुरुस्ती नंतर : १९४८ मध्ये महात्मा गांधींच्या खुनानंतर सरकारने राष्ट्रीय स्वयंसेवक संघ व हिंदू महासभा या दोन्ही संघटनांवर बंदी घातली. तसेच 'राष्ट्रीय स्वयंसेवक संघ' प्रविष्टीत देखील गांधीवध ऐवजी महात्मा गांधीजींच्या खुनाने संघावर फार मोठा आघात झाला. असा बदल करण्यात आला आहे. प्रभाकर कोंडबत्तुनवार यांनी या बदलाबाबत प्रतिक्रिया देताना म्हटले की, महात्मा गांधी हे राष्ट्राचे जनक आहेत. त्यांच्या मृत्यूबाबत 'वध' असा शब्दप्रयोग हा धार्मिक दृष्टिकोनातून गौरवात्मक आहे, तर 'खून' हा कायदेशीर आणि वास्तव दर्शवणारा शब्द आहे. विश्वकोशासारख्या अधिकृत दस्तऐवजात सत्य शब्द असणं आवश्यक आहे. या बदलामुळे महाराष्ट्र विश्वकोश मंडळाचे कार्य समाजमाध्यमांवर व्यापक प्रमाणात कौतुकास्पद ठरत आहे. अनेक बुद्धिजीवी, पत्रकार आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी या निर्णयाचे स्वागत केले आहे. अधिकृत विश्वकोश लिंक : महाराष्ट्र विश्वकोश मंडळ - https://marathivishwakosh.org ही सुधारणा केवळ शब्दांची नव्हे, तर इतिहासाच्या भाषेतील सत्याची पुनर्स्थापना आहे. गांधीवध या शब्दाऐवजी गांधी खून हा शब्द वापरल्याने न्याय आणि संवेदनशीलतेचा समतोल साधला गेला आहे.

## ज्ञानदीप मंडळाच्या सेंट जोसेफ कॉलेजमध्ये प्रा. डॉ. घोरुडे यांचे स्वागत

**वसई | गुरुदत्त वाकदेकर**



ज्ञानदीप मंडळाच्या सेंट जोसेफ महाविद्यालयात प्रा. डॉ. घोरुडे तात्यराव नामदेवराव यांनी नवीन प्राचार्य म्हणून पदभार स्वीकारला. स्वागत सोहळ्यात मंडळाचे अध्यक्ष फ्रान्सिस तुस्कानो, सचिव अँड्र्यू लोपीस, प्रभारी प्राचार्य, तसेच शिक्षकवर्ग व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. कार्यालय अधीक्षक विल्यम रॉड्रिग्ज ह्यांनी सर्व मान्यवरांचे स्वागत केले. प्रा. डॉ. घोरुडे यांच्या भौतिकशास्त्रातील शैक्षणिक व संशोधन कार्याचा गौरवपूर्ण परिचय देण्यात आला. त्यांनी ३० वर्षांहून अधिक काळ अध्यापन व २५ वर्षांचे संशोधन कार्य केले असून उपप्राचार्य, विभागप्रमुख व कार्यकारी प्राचार्य म्हणून दीर्घकाळ नेतृत्व निभावले आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली ६ संशोधकांनी पीएच.डी. पूर्ण केली, ५६ संशोधन लेख, १४ ग्रंथ, ३ पेटंट्स व ६ संशोधन प्रकल्प यशस्वीरीत्या पूर्ण झाले आहेत. मुंबई विद्यापीठाच्या बोर्ड ऑफ स्टडीज इन फिजिक्स चे अध्यक्ष तसेच विविध शैक्षणिक समित्यांवर त्यांनी उल्लेखनीय कार्य केले आहे. त्यांच्या शैक्षणिक योगदानासाठी ४ पुरस्कार प्राप्त झाले असून एपीआय स्कोअर १०२०.५ त्यांच्या कार्याचा भव्य पुरावा आहे. मंडळाचे अध्यक्ष फ्रान्सिस तुस्कानो यांनी त्यांना बुके, शॉल व सन्मानचिन्ह देऊन सन्मान केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कार्यालय अधीक्षक विल्यम रॉड्रिग्ज यांनी केले. उपस्थित मान्यवरांनी प्राचार्य डॉ. घोरुडे यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालय नवी शैक्षणिक शिखरे गाठेल, असा विश्वास व्यक्त केला. कार्यक्रमाच्या शेवटी सर्वांनी एकत्रितपणे नव्या प्राचार्यांचे हार्दिक अभिनंदन करून यशस्वी कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या.

## ग्रामीण डाक सेवकांसाठी कोकणी भाषेचे ज्ञान बंधनकारक

**पणजी | रयत समाचार**




भारत सरकारच्या टपाल विभागाने ग्रामीण डाक सेवक पदांच्या भरती धोरणात महत्त्वाचे बदल केले असून, गोव्यातील अर्जदारांसाठी आता कोकणी भाषेचे ज्ञान अनिवार्य करण्यात आले आहे. या संदर्भात टपाल विभागाने आज अधिकृत अधिसूचना जारी केली आहे. अधिसूचनेनुसार, गोव्यातील पोस्ट ऑफिसमध्ये ग्रामीण डाक सेवक पदांसाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांनी दहावीपर्यंत कोकणी किंवा मराठी यापैकी एक विषय शिकलेला असणे आवश्यक आहे. यामध्ये महत्त्वाचा बदल म्हणजे, ज्या उमेदवारांनी फक्त मराठी विषय शिकला आहे, त्यांना देखील कोकणी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे. दहावीपर्यंत कोकणी विषय शिकलेला नसल्यास, उमेदवाराला कोकणी भाषेचे ज्ञान असल्याचे प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक असेल. हे प्रमाणपत्र गोवा कोकणी अकादमी किंवा गोवा राज्य सरकारने अधिकृत केलेल्या कोणत्याही संस्थेकडून मिळालेले असावे. गोव्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी या निर्णयाचे स्वागत केले आहे. त्यांनी गोवा क्षेत्राचे टपाल सेवा संचालक रमेश पाटील यांच्याशी झालेल्या भेटीनंतर ही माहिती (ट्विटर) समाजमाध्यमावर दिली. मुख्यमंत्री सावंत म्हणाले की, या निर्णयामुळे भरती प्रक्रियेत स्थानिक गोमंतकीयांना प्राधान्य मिळेल, तसेच राज्यातील तरुणांसाठी रोजगाराच्या अधिक संधी खुल्या होतील. यामुळे राज्यातील टपाल सेवेचे वितरण अधिक मजबूत होईल, असे त्यांनी स्पष्ट केले.



## पारनेर साखर कारखान्याच्या पुनरुज्जीवनासाठी मंत्रालयात बैठक

### सरकारकडून सकारात्मक संकेत

**मुंबई | रयत समाचार**

पारनेर सहकारी साखर कारखान्याच्या पुनरुज्जीवनासाठी मंत्रालयात महत्त्वपूर्ण बैठक संपन्न झाली. या बैठकीत राज्य सरकारने कारखाना पुन्हा सुरू करण्याबाबत सकारात्मक भूमिका दर्शवली. बैठकीस सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, आमदार काशिनाथ दाते, तसेच अशोक सावंत, ॲड. रामदास घावटे, भूमिपुत्र शेतकरी संघटनेचे संतोष वाडेकर, कम्युनिस्ट पक्ष तसेच शेतकरी संघटनेचे बबनराव सालके, बाळासाहेब बोरकर, साहेबराव मोरे, बबन कवाद, दिगंबर लाळगे, बाळशीराम पायमोडे, महेंद्र पांढरकर, संतोष यादव, सुनिल चौधरी, शंकर गुंड, जालिंदर लंके, रोहिदास लामखडे, संभाजीराव सालके, बाबाजी गाडीलकर, रामदास सालके, संतोष सालके, गोविंद बडवे, बाळासाहेब वाळुंज, किरण पुरी, संजय वाखारे आदी मान्यवर उपस्थित होते. बैठकीत पारनेर तालुक्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या हितासाठी कारखाना पुनरुज्जीवनाचे मार्ग मोकळे करण्याबाबत सविस्तर चर्चा झाली. मंत्री बाबासाहेब पाटील यांनी शासन कारखान्याच्या पुनरुज्जीवनाबाबत गंभीर असून, आवश्यक त्या सर्व पातळ्यांवर प्रयत्न सुरू असल्याचे स्पष्ट केले. बैठकीनंतर उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले की, पारनेर कारखाना पुन्हा सुरू झाला तर परिसरातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांना नवसंजीवनी मिळेल. स्थानिक नेतृत्व, शेतकरी संघटना आणि शासन यांचे समन्वयातून लवकरच सकारात्मक निर्णय होईल, अशी आशा व्यक्त करण्यात आली. ''शेतकऱ्यांचा ऊस वाया जाऊ नये, रोजगार पुन्हा निर्माण व्हावा आणि सहकार पुन्हा फुलावा हेच आमचे ध्येय आहे,'' असे मत बैठकीनंतर बबनराव सालके यांनी व्यक्त केले.

## १२ ऑक्टोबरला नगरमध्ये महाराष्ट्र स्त्रीमुक्ती परिषद

### महिलांच्या बदलत्या वाटचालीचा मागोवा घेण्यासाठी एकजूट

**अहमदनगर | रयत समाचार**

स्त्रियांच्या चळवळीचा अर्धशतकाचा प्रवास, समाजातील बदल आणि पुढील वाटचालीची दिशा ठरवण्यासाठी अहमदनगरमध्ये जिल्हाव्यापी महिला परिषद आयोजित करण्यात आली. महाराष्ट्र स्त्रीमुक्ती परिषद, अहमदनगर आणि ग्रामीण विकास अभ्यास केंद्र (सीएसआरडी) यांच्या संयुक्त विद्यमाने ही परिषद रविवारी ता.१२ ऑक्टोबर रोजी सकाळी दहा ते सायंकाळी पाच या वेळेत सीएसआरडी सभागृहात होणार आहे. १९७५ मध्ये संयुक्त राष्ट्र संघाने आंतरराष्ट्रीय महिला वर्ष घोषित केले होते. त्या घोषणेला यंदा ५० वर्षे पूर्ण होत आहेत. या पन्नास वर्षांत स्त्रियांच्या जीवनात लक्षणीय बदल झाले. चळवळींनी कायदे बदलवले, सरकारी धोरणे सुधारली, सामाजिक दृष्टिकोन व्यापक झाला. या बदलांचा आढावा घेऊन आगामी काळातील स्त्री चळवळीची दिशा ठरवण्यासाठी महाराष्ट्र स्त्रीमुक्ती परिषद हा राज्यव्यापी मंच स्थापन करण्यात आला आहे. अहमदनगर जिल्ह्यातील स्त्रीवादी कार्यकर्त्या आणि संघटनांनी या मंचाच्या माध्यमातून महिलांच्या प्रश्नांचा सखोल अभ्यास सुरू केला आहे. अलीकडेच जिल्ह्यातील सार्वजनिक वाहतुकीतील महिलांच्या सुरक्षिततेचा सर्वेक्षणात्मक अहवाल तयार करण्यात आला आहे. परिषदेचे उद्घाटन सीएसआरडीचे प्राचार्य डॉ. सुरेश पठारे यांच्या हस्ते होणार असून, कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ स्त्रीवादी कार्यकर्त्या ॲड. निशा शिवूरकर असतील. दिवसभर चालणाऱ्या या परिषदेत गेल्या पन्नास वर्षातील स्त्री चळवळीचा आढावा, महाराष्ट्र स्त्रीमुक्ती परिषदेच्या मोहिमा आणि आगामी कार्यक्रम, भारतीय संविधाना समोरील आक्रमक राष्ट्रवादाचे आव्हान, अहमदनगर जिल्ह्यातील बेपत्ता झालेल्या मुलींचा प्रश्न, तसेच स्त्रियांवरील वाढती हिंसा यांसारख्या विषयांवर मान्यवर मार्गदर्शन करणार आहेत. या परिषदेसाठी डॉ. मनीषा गुप्ते, कॉ. लता भिसे-सोनवणे, साथी रमेश अवस्थी यांसारखे ज्येष्ठ स्त्रीवादी कार्यकर्ते प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. जिल्ह्यातील विविध महिला संघटना, कार्यकर्त्या आणि नागरिकांनी या परिषदेत मोठ्या संख्येने सहभाग घ्यावा, असे आवाहन नीलिमा जाधव-बंडेलू, कॉ. स्मिता पानसरे, संध्या मेढे, ॲड. निर्मला चौधरी, सरोज आल्हाट, मदिना शेख, ॲड. मीनल देशमुख, सत्यभामा थिटमे यांनी संयुक्तपणे केले आहे.

## भारत आणि दक्षिण आशियात प्रथमच 'नेओटोम अल्फा फोटॉन काउंटिंग सीटी स्कॅनर'चे लोकार्पण

### हृदय आरोग्याचा नवा मापदंड तंत्रज्ञान आणि सेवा दोन्हींचा संगम सर एच.एन. रिलायन्स फाउंडेशन हॉस्पिटलचा प्रगत दृष्टीकोन

**मुंबई | गुरुदत्त वाकदेकर**

वर्ल्ड हार्ट डेच्या निमित्ताने सर एच.एन. रिलायन्स फाउंडेशन हॉस्पिटलने हृदय आरोग्य संवर्धनासाठी एक ऐतिहासिक आणि परिवर्तनकारी पाऊल उचलले आहे. वाढत्या हृदयविकारांच्या पार्श्वभूमीवर हॉस्पिटलने नागरिक सक्षमीकरण, अत्याधुनिक वैद्यकीय तंत्रज्ञान आणि आरोग्य कर्मचाऱ्यांसाठी विशेष उपक्रम अशा तीन स्तरांवर आरोग्य संवर्धनाचा व्यापक आराखडा सादर केला आहे. या मोहिमेचा केंद्रबिंदू ठरला तो 'नेओटोम अल्फा फोटॉन काउंटिंग सीटी स्कॅनर' चा शुभारंभ भारत आणि दक्षिण आशियातील पहिला असा स्कॅनर. हे अत्याधुनिक तंत्रज्ञान पारंपरिक कोरोनरी अँजिओग्राफीला एक सुरक्षित आणि अचूक पर्याय ठरते. यात ३० ते ५० टक्के कमी किरणोत्सर्गासह उच्च दर्जाच्या रेझोल्यूशन प्रतिमा मिळतात, ज्यामुळे सूक्ष्म अडथळे, स्टेंट तपासणीतील मर्यादा आणि कॅल्सिफाइड प्लॅक्स यांचा अचूक मागोवा घेता येतो. निदानाच्या या नव्या पद्धतीने हृदय





तपासणीतील सुरक्षितता आणि विश्वासार्हतेचे नवे मानदंड प्रस्थापित केले आहेत. या नव्या टप्प्याबाबत बोलताना, डॉ. तरंग गिआनचंदानी, ग्रुप सीईओ हेल्थकेअर इनिशिएटिव्ह्ज व सीईओ सर एच.एन. रिलायन्स फाउंडेशन हॉस्पिटल, म्हणाल्या, ''हृदयविकारासंदर्भात फक्त जनजागृती पुरेशी नाही; लोकांना त्या दिशेने पावले उचलण्यासाठी प्रेरित करणं गरजेचं आहे. फोटॉन काउंटिंग सीटी स्कॅनरचा शुभारंभ ही आमच्या दूरदृष्टीची साक्ष आहे जी नवतंत्रज्ञान आणि प्रतिबंधात्मक आरोग्यसेवांचा समन्वय साधते. यासोबतच आमचे मोफत सीपीआर प्रशिक्षण शिबिर आणि 'केअर फॉर द केअरगिव्हर' उपक्रम हे आम्ही समुदाय आरोग्याकडे समग्र दृष्टीकोनातून पाहतो याचे उत्तम उदाहरण आहे.

हॉस्पिटलने नागरिकांसाठी मोफत सीपीआर प्रशिक्षण शिबिर आयोजित करून जीवन वाचवण्याचे प्रत्यक्ष कौशल्य प्रसारित करण्याचा उपक्रम हाती घेतला आहे. आतापर्यंत ५०० हून अधिक कर्मचारी, विद्यार्थी, सामाजिक कार्यकर्ते आणि रिलायन्सचे कर्मचारी यांना प्रशिक्षण देण्यात आले असून हे प्रशिक्षित नागरिक ''फर्स्ट रिस्पॉन्डर'' म्हणून सज्ज झाले आहेत. भारतात दररोज हजारो लोकांचा मृत्यू अचानक कार्डिॲक अरेस्टमुळे होतो, अशा परिस्थितीत हा उपक्रम जीवनरक्षक ठरत आहे. तसेच, 'केअर फॉर द केअरगिव्हर' या मोहिमेद्वारे डॉक्टर आणि आरोग्य कर्मचाऱ्यांसाठी १०० हून अधिक मोफत हृदय आरोग्य तपासणी सत्र आयोजित करण्यात आली आहेत. आरोग्यसेवा देणाऱ्यांचे स्वतःचे आरोग्य सुरक्षित ठेवणे ही देखील तितकीच महत्त्वाची जबाबदारी आहे, हे हॉस्पिटलने या उपक्रमातून अधोरेखित केले आहे. या सर्व मोहिमांना 'ओन द टफ कॉल' या प्रचार अभियानाद्वारे जनसामान्यांपर्यंत पोहोचवले जात आहे. लघुचित्रफितींमार्फत पोषणमूल्यपूर्ण आहार, दररोजचा व्यायाम आणि नियमित तपासणी यांसारख्या लहान पण निर्णायक कृती आरोग्यसंपन्न आयुष्याची गुरुकिल्ली ठरू शकतात, हा संदेश दिला जात आहे. या सर्व उपक्रमांच्या माध्यमातून सर एच.एन. रिलायन्स फाउंडेशन हॉस्पिटलने एकविसाव्या शतकातील हृदय आरोग्याची नवी व्याख्या साकारली आहे ज्यामध्ये तंत्रज्ञान, समुदाय सहभाग आणि केअरगिव्हर्सच्या काळजीचा समतोल साधत निरोगी, सक्षम आणि सजग समाज घडवण्याचा संकल्प दृढ करण्यात आला आहे.

# मनपा कर्मचारी पतसंस्था चेअरमन पदी विजय कोतकर व्हॉ. चेअरमनपदी किशोर कानडे बिनविरोध



**अहमदनगर । रयत समाचार**

महानगरपालिका कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या चेअरमन पदावर विजय कोतकर तर व्हॉइस चेअरमन पदावर किशोर कानडे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. निवडणूक निर्णय अधिकारी महेश पालवे यांच्या अध्यक्षतेखाली ही निवड प्रक्रिया पार पडली. चेअरमन पदासाठी विजय कोतकर यांच्या नावाची सूचना संचालक शेखर देशपांडे यांनी मांडली, तर अनुमोदन संचालक कैलास चावरे यांनी दिले. व्हॉइस चेअरमन पदासाठी किशोर कानडे यांची सुचनेची प्रक्रिया कैलास चावरे यांनी मांडली, तर अनुमोदन सतीश ताठे यांनी केले. यासोबतच बलराज गायकवाड यांनीही निवडीला समर्थन दिले. निवड प्रक्रियेला माजी अध्यक्ष विकास गीते, ज्येष्ठ संचालक बाबासाहेब मुदगल, तज्ज्ञ संचालक जितेंद्र सारसर, संचालक बाळासाहेब गंगेकर, अजय कांबळे, गुलाब गाडे, सोमनाथ सोनवणे, बाळासाहेब पवार, प्रमिला पवार, तसेच कार्यलक्षी संचालक आनंद तिवारी आदी मान्यवर उपस्थित होते. सभासदांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती आणि नव्या पदाधिकाऱ्यांचे स्वागत केले. या वेळी नूतन चेअरमन विजय कोतकर म्हणाले, ''संचालक मंडळाने माझ्यासारख्या नवीन संचालकावर विश्वास ठेवून चेअरमन पदाची जबाबदारी सोपविली आहे. सभासद व मनपा कर्मचारी यांच्या हितासाठी पारदर्शक निर्णय घेण्यावर माझा भर राहील. पतसंस्थेचा कारभार पारदर्शक ठेवून संस्थेला यशाच्या शिखरावर नेण्याचा प्रयत्न करू. सर्व संचालक व सदस्यांना सोबत घेऊन चांगले कार्य करणार असून, पदाला न्याय देण्याचा प्रयत्न करेन.'' व्हॉइस चेअरमन किशोर कानडे यांनीही सर्वांचे आभार मानत संस्थेच्या प्रगतीसाठी नव्या संचालक मंडळाच्या माध्यमातून एकजुटीने काम करण्याची ग्वाही दिली. ज्येष्ठ संचालक बाबासाहेब मुदगल यांनी पतसंस्थेच्या कारभाराचा आढावा घेत, संस्थेने गेल्या काही वर्षांत साधलेल्या प्रगतीबद्दल समाधान व्यक्त केले. कार्यलक्षी संचालक आनंद तिवारी यांनी नव्या चेअरमन व व्हॉइस चेअरमन यांचे अभिनंदन करत पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या.

# १० ऑक्टोबरला नागरदेवळे येथे नेत्रतपासणी व शस्त्रक्रिया शिबिर


## जागतिक अंध दिनानिमित्त फिनिक्स सोशल फाऊंडेशनचा उपक्रम

**अहमदनगर । प्रतिनिधी**

फिनिक्स सोशल फाऊंडेशनच्या वतीने जागतिक अंध दिनानिमित्त शुक्रवार, ता. १० ऑक्टोबर २०२५ रोजी मोफत नेत्रतपासणी तसेच मोतीबिंदू, काचबिंदू व तिरळेपणा शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर नागरदेवळे येथील संत सावता महाराज मंदिरात सकाळी ९ ते दुपारी ३ या वेळेत होणार असल्याची माहिती फिनिक्स फाऊंडेशनचे अध्यक्ष जालिंदर बोरुडे यांनी दिली.

या शिबिरात सर्व रुग्णांची मोफत नेत्रतपासणी करण्यात येईल. ज्या रुग्णांना शस्त्रक्रियेची आवश्यकता असेल, त्यांच्यावर पुणे येथील बुधराणी हॉस्पिटलमध्ये मोफत शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे. तसेच रुग्णांच्या राहण्याची व जेवणाची मोफत व्यवस्था करण्यात आली आहे. या उपक्रमाचा लाभ घेण्यासाठी इच्छुक व गरजू रुग्णांनी नावे नोंदवून अधिक माहितीसाठी जालिंदर बोरुडे (मो. ९८८१८१०३३३) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन फिनिक्स फाऊंडेशनचे अध्यक्ष जालिंदर बोरुडे यांनी केले आहे.

# अर्धवट ड्रेनेज कामामुळे सांडपाणी रस्त्यावर



**अहमदनगर । विजय मते**

प्रभाग क्रमांक दोन मधील गावडे मळा परिसरात जुना पिंपळगाव रोड रस्ता अद्यायावत करण्याचे काम सुरू आहे.

सिटी प्राईड हॉटेल जवळ ठेकेदाराने नवीन ड्रेनेज लाईनचे काम अर्धवट सोडल्यामुळे संपूर्ण परिसरात सांडपाणी साचले आहे. जुन्या लाईनचे काम निकामी झाल्याने दुर्गंधी आणि आरोग्याचा धोका वाढला आहे. स्थानिक नागरिकांच्या तक्रारीनंतर माजी नगरसेवक निखिल वारे यांनी पाहणी केली आणि आमदार संग्राम जगताप यांना माहिती दिली. जगताप यांनी तात्काळ आयुक्तांना कार्यवाहीचे आदेश दिले, तर ठेकेदाराला प्रलंबित काम पूर्ण करण्याचे निर्देशही देण्यात आले. यावेळी निखिल वारे म्हणाले, ''सांडपाणी केवळ स्वच्छतेचा नाही, तर आरोग्याचा गंभीर प्रश्न आहे. ठेकेदाराने जबाबदारीने काम पूर्ण करावे. नागरिकांवर अन्याय होऊ देणार नाही.'' सांडपाण्याचा निचरा करण्यासाठी जेसीबीने काम सुरू केले आहे. यावेळी माऊली गायकवाड, वैभव लोळगे, रोहित त्र्यंबके, अशोक कासार, सचिन कुसळकर, अवधूत कासार, संतोष गावडे आणि साठे यांसह नागरिक उपस्थित होते.

# मैलामिश्रित पाण्याचा खड्डा तातडीने हटवा- संपत बारस्कर



**काही दिवसांपूर्वी तपोवन रोडच्या बेसमेंटच्या खड्ड्यामध्ये पावसाचे पाणी साचल्यामुळे एका लहान मुलाचा दुर्दैवी मृत्यू झाला होता. अशी घटना पुन्हा घडू नये, म्हणूनच तपोवन हडको येथील मैल मिश्रित खड्डा तातडीने हटवण्याची मागणी महापालिका आयुक्तांच्या निदर्शनास आणून दिली आहे. जर तातडीने उपयोजना न झाल्यास, महापालिकेत तीव्र स्वरूपाचे आंदोलन केले जाईल.**

**संपत बारस्कर,** माजी विरोधी पक्ष नेते, मनपा

**अहमदनगर । रयत समाचार**

तपोवन हडको येथे सर्वसामान्य नागरिकांच्या लोकवसाहतीजवळील ओपन स्पेस मधील मोठ्या मैल मिश्रित पाण्याच्या खड्ड्यामुळे परिसरात दुर्गंधी निर्माण झाली असून, साथीचे आजार पसरण्याची दाट शक्यता आहे. तसेच या ओपन स्पेसमध्ये लहान मुले खेळत असल्याने, एखाद्या मुलगा खड्ड्यात पडल्यास दुर्दैवी घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही, असे माजी विरोधी पक्ष नेते संपत बारस्कर यांनी म्हटले.

संपत बारस्कर यांनी या समस्येबाबत महापालिका आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांच्याकडे तातडीने कारवाई करण्याची मागणी केली. यावेळी तपोवन हडकोतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. आयुक्त यशवंत डांगे यांनी शिष्टमंडळाला सांगितले की, तातडीने या भागाची पाहणी करून उपाययोजना केल्या जातील. त्यानंतर त्यांनी सायंकाळी तपोवन हडकोत जाऊन नागरिकांसमवेत प्रत्यक्ष पाहणी केली. या परिसरात तीन ओपन स्पेस असून, सोडविण्यात आलेल्या सांडपाण्याचा प्रश्न गंभीर आहे; मात्र सर्व पाणी शेजारील वाड्यामध्ये ड्रेनेज लाईनच्या साह्याने सोडविण्यात येईल, असे आश्वासन त्यांनी दिले.



# मराठा आंदोलकांवरील ११ गुन्हे मागे घेण्यास पात्र

## त्रिसदस्यीय समितीची मान्यता

**अहमदनगर । रयत समाचार**

गणेशोत्सवाच्या काळात मराठा आरक्षणासाठी सुरू असलेल्या आंदोलनाच्या समारोपानंतर मराठा आंदोलकांवरील गुन्हे मागे घेण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. मागील वर्षी दाखल झालेल्या गुन्ह्यांपैकी ११ गुन्हे मागे घेण्यास जिल्हास्तरावर स्थापन झालेल्या त्रिस्तरीय समितीने पात्र ठरवले असून, पुढील न्यायालयीन प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. या गुन्ह्यांमध्ये शहर व तालुका पोलिस ठाण्यांतील विविध गुन्हे समाविष्ट आहेत. समितीशिवाय उर्वरित गुन्ह्यांची तपासणी देखील सुरू आहे. ही प्रक्रिया मराठा आरक्षण आंदोलनाचे शिस्तबद्ध समारोप आणि आंदोलनादरम्यान दाखल झालेले गुन्हे मागे घेण्याच्या आश्वासनानुसार सुरू करण्यात आली आहे. सकल मराठा समाजाच्या शिष्टमंडळाने या कार्यवाहीसाठी जिल्हा पोलीस अधिकाऱ्यांचे आभार मानले आहेत. यावेळी ॲड. अनुराधा येवले, ॲड गजेंद्र दांगट, ॲड हरीश भांबरे यांच्यासह मदन आढाव, वैभव भोगाडे, स्वप्निल दगडे, अभय शेंडगे, निलेश सुंबे, राम जरांगे, संदीप जगताप, प्रमोद कोरडे, सिद्धांत पानसरे, भारत भोसले, रमेश मुंगसे, सागर भोसले, जगन्नाथ निमसे, सोमनाथ गुंड, राम सातपुते आदी उपस्थित होते.

# मोफत उद्योजकता प्रशिक्षण

## युवक-युवतींना व्यवसाय उभारणीची संधी

**अहमदनगर । रयत समाचार**

जिल्ह्यातील युवक-युवतींना रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देण्यासाठी जिल्हा उद्योग केंद्र, अहिल्यानगर आणि महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र (एमसीईडी) यांच्या संयुक्त विद्यमाने सर्वसाधारण घटक व विशेष घटक योजनेअंतर्गत तांत्रिक उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या प्रशिक्षण उपक्रमाअंतर्गत जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात विविध व्यावसायिक क्षेत्रांतील प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येणार आहेत. यात डाटा एन्ट्री ऑपरेटर, फॅशन डिझायनिंग, ब्युटी पार्लर, बेकरी प्रॉडक्ट्स, हॉटेल मॅनेजमेंट, ड्रोन ऑपरेशन, तसेच दुचाकी व तीन चाकी वाहन दुरुस्ती अशा विविध विषयांचा समावेश आहे. उद्देश हा आहे की, जिल्ह्यातील सुशिक्षित युवक-युवतींना स्वावलंबी बनवणे, कौशल्यविकासाद्वारे त्यांना व्यवसाय व उद्योजकतेकडे वळवणे. प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर सहभागी प्रशिक्षणार्थींना स्वतःचा व्यवसाय सुरू करण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन देखील दिले जाणार आहे. सदर प्रशिक्षणासाठी अर्जदार किमान आठवी उत्तीर्ण असणे, वय १८ ते ४५ वर्षांदरम्यान असणे आणि स्वतः चा व्यवसाय सुरू करण्याची प्रबळ इच्छा असणे आवश्यक आहे. या




उपक्रमाबाबत माहिती देताना जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक दीपक शिवदास व एमसीईडीचे प्रकल्प अधिकारी रमेश जाधव यांनी सांगितले की, जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगार युवक-युवतींनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा. प्रशिक्षणातून मिळणारे कौशल्य त्यांच्या उद्योजकतेसाठी भक्कम पायाभूत ठरणार आहे. अहिल्यानगर जिल्ह्यात सुरू होणाऱ्या या मोफत उद्योजकता विकास प्रशिक्षणामुळे युवकांना केवळ रोजगार मिळणार नाही, तर स्वतःचे उद्योग उभारून इतरांनाही रोजगार देण्याची संधी मिळणार आहे. शासनाच्या स्वावलंबी भारत संकल्पनेला मूर्त रूप देणारा हा उपक्रम असून, याचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. अधिक माहिती, अर्ज प्रक्रिया व प्रशिक्षण स्थळांची माहिती मिळवण्यासाठी महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र (एमसीईडी) मार्फत जिल्हा उद्योग केंद्र, अहिल्यानगर मोबाईल क्रमांक ९१६८६६७१६६ येथे संपर्क साधावा, असे सांगण्यात आले आहे.

# सरन्यायाधीश गवई यांच्यावर बूट फेकणाऱ्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करा

## महाराष्ट्र राज्य चर्मकार विकास संघाची मागणी



**अहमदनगर । रयत समाचार**

देशाच्या सर्वोच्च न्यायालयाचे सर न्यायाधीश बी.आर. गवई यांच्यावर जातीयवादी प्रवृत्तीच्या राकेश किशोर यांनी बूट फेकल्याच्या प्रकरणी देशद्रोहाचा गुन्हा दाखल करावा, तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यावर उड्डाणपुलावरून पत्रके फेकून विटंबना करणाऱ्या प्रकारामागील सूत्रधार शोधावा, अशी मागणी महाराष्ट्र राज्य चर्मकार विकास संघाचे प्रदेशाध्यक्ष संजय खामकर यांनी केली . या मागणीसाठी त्यांनी संघाचे शिष्टमंडळ घेऊन जिल्हा पोलीस अधीक्षक यांना निवेदन दिले. निवेदनात म्हटले आहे की, सरन्यायाधीशांवर झालेला हल्ला केवळ व्यक्तीवर नाही, तर देशाच्या सर्वोच्च न्यायालय आणि संविधानावर झाला आहे. हल्ला करणारा उच्च शिक्षित वकील असून, नियोजनबद्ध कट रचून हे कृत्य केले आहे. तसेच डॉ. आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळ झालेल्या अपमानजनक कृत्यामागील सूत्रधाराचा शोध घेऊन त्याच्यावर समाजद्रोहाचा गुन्हा दाखल करावा, अशी मागणी त्यांनी केली आहे. निवेदनावर संघाचे अनेक पदाधिकारी आणि सदस्यांनी सह्या केल्या आहेत. यावेळी त्यांच्या समवेत शहर जिल्हाध्यक्ष विनोद कांबळे, गणेश लव्हाळे, बाळासाहेब लव्हाळे, भिकाजी वाघ , अंकुश खरात, नागोराव म्हस्के, चांगदेव शेंडे, बाबुलाल शिंगरे आदि उपस्थित होते.

रयत समाचार Classified छोटी जाहिरात

छोटी जाहिरात, उत्तम प्रतिसाद

खरेदी विक्री । नोकरी विषयक । नावात बदल
आरोग्य विषयक । वाढदिवस । विवाह विषयक




निसार Art
सर्व प्रकारच्या व्यावसायिक क्षेत्रातील वॉल पेन्टीग जाहिरात (भिंत पेंटिंग) साठी राज्यातील नावाजलेले निसार आर्ट
7020356335 | 9860830016
पत्ता : प्लॉट नं.३, नवीन महानगरपालिकेसमोर, औरंगाबाद रोड, अ.नगर.

रावसाहेबचा चहा, एकदा पिऊन पहा!
कोतवाली पोलीसस्टेशन शेजारील सुप्रसिध्द
जगदंबा टी सेंटर
चहा, कॉफी, लेमन टी
शाखा नं.१- माणिक चौक, अ.नगर
शाखा नं.२- वसंत टॉकीजजवळ, भोला पान सेन्टर शेजारी, अ.नगर
प्रो.प्रा. रावसाहेब ठोंबे
97655 58585

हॉटेल भाड्याने देणे
नगर-सोलापूर हायवेपासून पाच मिनिटांच्या अंतरावर असणाऱ्या कानडेमळा येथील सारसनगर चौकातील सुस्थितीत असणारे हॉटेल भाड्याने चालविण्यास देणे आहे. किमान ३० ते ५० लोक एकावेळी बसतील अशी पीओपी आणि लाईट फिटिंगसह बैठक व्यवस्था, व्हेज-नॉन, व्हेजसाठी स्वतंत्र किचन, सर्व किचन साहित्य टेबल, सोफे, पाण्याची व्यवस्था इत्यादीसह देणे आहे.
- संपर्क -
९०११११३७००

सर्व प्रकारच्या छोट्या जाहीरातींसाठी ८८०५४०१८०० | ७७७४००१८०० | ९८२२४९६६६४ या क्रमांकावर संपर्क करा

हे दैनिक प्रकाशक, मालक, संपादक, भैरवनाथ तुकाराम वाकळे, 8805401800 यांनी मुद्रक आबीदखान दुलेखान यांच्या मखदुम प्रिंटर्स,३५८८, माणिक चौक, अहमदनगर येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. कार्यालयाचा पत्ता : ५, गजानन अपार्टमेंट, झोपडी कॅन्टीन, मनमाडरोड, सावेडी, अहमदनगर-०३.कार्यालय, 8805401800 Email : rayatsamachar007@gmail.com , उपसंपादक : दिपक शिरसाठ, 7774001800, समूह संपादक : प्रभाकर ढगे, पणजी, गोवा, 9373021584, गोवा कार्यालय : १३१, गोमंतक प्रेस जवळ, सांतिनेज, पणजी - गोवा, कर्नाटक कार्यालय : श्रीकांत काकतीकर, निवासी संपादक,१९१, बॅ.नाथ पै चौक, पोस्ट ऑफीसच्या मागे, शहापूर, बेळगाव कर्नाटक, 9036799516,shrikantkaktikar@gmail.com (वाद-विवाद अहमदनगर न्यायालयीन न्यायकक्षेत)

# नगरपालिका वीस प्रभागांचे आरक्षण जाहीर; राजकीय हालचालींना वेग



**पाथर्डी । नितीन गटाणी**

आगामी नगरपालिका निवडणुकीसाठी नगरसेवक पदाचे वीस प्रभागांचे प्रारूप आरक्षण आज पालिका सभागृहात जाहीर करण्यात आले. यामुळे निवडणूक लढविणाऱ्या इच्छुकांची दिशा आता स्पष्ट झाली असून, पालिका वर्तुळातील राजकारण ढवळून निघण्याची चिन्हे दिसत आहेत. मागील निवडणुकीत नगरपरिषदेचे १७ नगरसेवक होते, तर यावेळी ही संख्या २० वर पोहोचली आहे. एकूण दहा प्रभागांसाठी हे वीस वार्ड आरक्षण जाहीर करण्यात आले. या वेळी प्रांताधिकारी प्रसाद मते, मुख्याधिकारी संतोष लांडगे, पोलीस उपनिरीक्षक विलास जाधव, तसेच शहर अभियंता नरेंद्र तेलोरे यांच्या प्रमुख उपस्थितीत नाथनगर प्राथमिक शाळेतील विद्यार्थिनी सोनक केदार आणि वेदिका काकडे यांच्या हस्ते चिठ्ठ्या काढून आरक्षण घोषित करण्यात आले. या आरक्षणात अनुसूचित जातींसाठी राखीव असणाऱ्या प्रभाग क्रमांक दोनमध्ये अनुसूचित जाती सर्वसाधारण, तर प्रभाग क्रमांक आठमध्ये अनुसूचित जाती महिला आरक्षण निघाले आहे. विशेष म्हणजे, मागील वेळी देखील या प्रभागांमध्ये याच प्रकारचे आरक्षण होते. त्यामुळे प्रभाग क्रमांक आठमध्ये निवडणूक लढविण्यास इच्छुक असलेल्या अनुसूचित जाती पुरुष उमेदवारांमध्ये नाराजी दिसून आली. प्रत्येक प्रभागात एक महिला आणि एक पुरुष उमेदवारासाठी आरक्षण असल्याने बहुतांशी इच्छुकांना उमेदवारीचा मार्ग मोकळा झाला आहे. आरक्षण जाहीर होताच अनेकांनी आपल्या समर्थक कार्यकर्त्यांच्या भेटीगाठी सुरू केल्या असून, काही इच्छुकांच्या समर्थकांत सोशल मीडियावर ‘‘भावी नगरसेवक’’ म्हणून फोटो व व्हिडिओ शेअर करण्याची चढाओढ सुरू झाली आहे. दरम्यान, जाहीर केलेल्या या प्रारूप आरक्षणावर १४ ऑक्टोबरपर्यंत हरकती सादर करता येतील, तर १३ ऑक्टोबरपर्यंत विशिष्ट फॉर्मद्वारे मतदार यादीसंदर्भात हरकत घेता येईल.

**प्रभागनिहाय आरक्षण पुढीलप्रमाणे:**

प्रभाग क्र. १ : अ) नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला, ब) सर्वसाधारण खुला, प्रभाग क्र. २ : अ) अनुसूचित जाती सर्वसाधारण, ब) सर्वसाधारण महिला, प्रभाग क्र. ३ : अ) सर्वसाधारण महिला, ब) सर्वसाधारण खुला, प्रभाग क्र. ४ : अ) नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला, ब) सर्वसाधारण खुला, प्रभाग क्र. ५ : अ) सर्वसाधारण महिला, ब) सर्वसाधारण खुला, प्रभाग क्र. ६ : अ) नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला, ब) सर्वसाधारण खुला, प्रभाग क्र. ७ : अ) नागरिकांचा मागास प्रवर्ग सर्वसाधारण, ब) सर्वसाधारण महिला, प्रभाग क्र. ८ : अ) अनुसूचित जाती महिला, ब) सर्वसाधारण खुला, प्रभाग क्र. ९ : अ) नागरिकांचा मागास प्रवर्ग सर्वसाधारण, ब) सर्वसाधारण महिला, प्रभाग क्र. १० : अ) सर्वसाधारण महिला, ब) सर्वसाधारण खुला. ६ ऑक्टोबर रोजी नगराध्यक्ष पदाचे आरक्षण ‘नागरिकांचा मागास प्रवर्ग सर्वसाधारण’ असे घोषित झाले होते. त्यानंतर आता नगरसेवक पदाचे आरक्षण जाहीर झाल्याने आगामी निवडणुकीत इच्छुकांसाठीचे चित्र पूर्णतः स्पष्ट झाले आहे. त्यामुळे सर्वपक्षीय राजकीय हालचालींना गती मिळणार आहे.



# शेवगाव-राक्षी-पैठण बस सेवा पुन्हा सुरू करा

**शेवगाव । लक्ष्मण मडके**

गेल्या अनेक वर्षांपासून नियमित सुरू असलेली शेवगावराक्षी मार्गे पैठण एसटी बस सेवा काही काळापूर्वी थांबविण्यात आली होती. मात्र, आता राक्षी ते खानापूर या दरम्यानचा रस्ता नव्याने तयार झाल्यामुळे ही बस सेवा तातडीने पुन्हा सुरू करावी, अशी मागणी नागरिकांकडून जोर धरत आहे. पूर्वी ही बस सेवा राक्षी मार्गे चालू होती; परंतु रस्ता दुरावस्थेत गेल्याने ती घोटणखानापूर मार्गे सुरू करण्यात आली होती. मात्र आता तोच रस्ता पूर्णपणे नवीन व दुरुस्त झाल्याने नागरिकांना पुन्हा जुन्या मार्गावरून प्रवासाची सुविधा मिळावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. सध्या या परिसरात एसटी बस सेवेची तीव्र कमतरता जाणवत असून, विशेषतः वृद्ध आणि धार्मिक स्थळांना भेट देऊ इच्छिणाऱ्या भाविकांना प्रवासात मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (MSRTC) नियमांनुसार ७५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना मोफत प्रवास, तर इतर ज्येष्ठांना सवलतीचा लाभ मिळतो. त्यामुळे या बस सेवेचा सामाजिक आणि सार्वजनिक दृष्ट्या मोठा फायदा होईल, असे नागरिकांचे मत आहे. स्थानिक नागरिक अतुल जुंबड, शकर जुंबड, भारत कातकडे, अफसर शेख, शिवाजी गाढे, बाळू जगधने, हैदर शेख, अमोल कातकडे, उद्धव कातकडे, ऋषिकेश जुंबड, ऋषिकेश उभेदळ, मनोज गव्हाणे आदींनी ही मागणी केली असून, शेवगावराक्षीपैठण बस सेवा पूर्ववत मार्गावरून तातडीने सुरू करण्यात यावी, अशी विनंती त्यांनी एसटी प्रशासनाकडे केली.

## पंचायत समिती सभापती पदाचे आरक्षण अनुसूचित जाती महिला राखीव

## धुरंधरांचा हिरमोड

**पाथर्डी । नितीन गटाणी**

तालुक्यातील पंचायत समिती सभापती पदाचे आरक्षण अनुसूचित जाती महिलासाठी जाहीर झाले असून, यामुळे इतर गटातील अनेक उमेदवारांचा हिरमोड झाला आहे. गणाचे आरक्षण पडल्यानंतरच पुढील राजकीय चित्र स्पष्ट होणार आहे. सुमारे १८ वर्षांपूर्वी, २००७ साली, पंचायत समिती स्थापनेपासून अडीच वर्षासाठी अनुसूचित जाती सर्वसाधारण आरक्षण जाहीर झाले होते. आता अनुसूचित जाती महिलांसाठी प्रथमच आरक्षण जाहीर झाल्याने सर्वसाधारण अथवा ओबीसी प्रवर्गातील इच्छुक उमेदवारांचा संताप वाढला आहे.

आज तालुक्यातील विविध गटातील संगीता काकासाहेब शिंदे, सुनीता राजेंद्र एडके, कांचन सुनील परदेशी, मोनिका बाबा राजगुरू, लक्ष्मी भगवान साठे, कविता महेश अंगारखे, ज्योती महेंद्र राजगुरू, सुनिता चंद्रकांत पाचरणे, पुष्पा दिगंबर गाडे, बेबीताई ज्ञानदेव केळगद्रे, शोभा वसंत बोर्डे, द्रोपदी पप्पू बोर्डे यांची नावे चर्चेत आहेत. ता. १३ ऑक्टोबर रोजी पंचायत समिती गणाची आरक्षण सोडत होणार आहे. कोणता गण अनुसूचित जाती महिलांसाठी आरक्षित होतो यावर पुढील राजकीय घडामोडी अवलंबून राहणार आहेत. तालुक्यातील राजकीय कार्यकर्त्यांसह निरीक्षकांचे लक्ष आता पक्षश्रेष्ठी कोणाला संधी देतील याकडे लागले आहे.



# अनेक दिवसांपासून बंद असलेली श्रीरामपूर – मुंबई बस सेवा पूर्ववत

**श्रीरामपूर । सलीमखान पठाण**

गेल्या अनेक दिवसांपासून बंद असलेली श्रीरामपूर - मुंबई बस सेवा पुन्हा सुरू झाली असून यामुळे प्रवाशांनी समाधान व्यक्त केले आहे. बस सेवा बंद झाल्यामुळे अनेक प्रवासी व व्यापाऱ्यांनी आमदार हेमंत ओगले यांच्याकडे निवेदन देऊन बस सेवा पुन्हा चालू करण्याची मागणी केली होती. सदर मागणी लक्षात घेऊन आमदार हेमंत ओगले यांनी राज्य परिवहन महामंडळाच्या अधिकाऱ्यांना तातडीने सूचना दिल्या होत्या. त्या अनुषंगाने ता. ६ ऑक्टोबर रोजी रात्री बस सेवा पूर्ववत सुरू झाली. या कार्यक्रमास आमदार हेमंत ओगले, युवा नेते करण ससाने, जिल्हा काँग्रेस कार्याध्यक्ष सचिन गुजर, माजी सभापती बाबासाहेब दिघे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सुधीर नवले, उपाध्यक्ष ज्ञानेश्वर मुरकुटे, माजी उपनगराध्यक्ष राजेंद्र सोनवणे, काँग्रेस शहराध्यक्ष अण्णासाहेब डावखर, तालुका अध्यक्ष प्रमोद भोसले, व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष गौतम उपाध्ये, पंडितमामा बोंबले, निलेश नागले, रियाज पठाण, मुक्तार शहा, प्रीतम बोरावके यांच्यासह प्रवासी आणि परिवहन महामंडळाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. बस सेवा पूर्ववत चालू झाल्याने प्रवासी व व्यापाऱ्यांनी आमदार हेमंत ओगले यांना धन्यवाद दिले. गेल्या महिन्यात आमदार ओगले यांच्या प्रयत्नाने श्रीरामपूर बस डेपोला दहा नव्या बस गाड्या मिळाल्या होत्या. येणाऱ्या दिवसांत प्रवाशांच्या सोयीसाठी कार्यरत राहणार असल्याचे आमदार ओगले यांनी स्पष्ट केले.

# निमगाव वाघा येथील ‘होईकात’ चळवळीचे भाकित

## ‘होईक’ ऐकण्यासाठी भाविकांची गर्दी

**नगर तालुका । रयत समाचार**

निमगाव वाघा येथील प्रसिध्द बिरोबा देवस्थान येथे मंगळवार, ता. ७ ऑक्टोबर झालेल्या होईकात (भविष्यवाणी) दहा खंडात चळवळी होणार असल्याचे, म्हणजेच सर्व क्षेत्रात अस्थिरता निर्माण होणार असल्याचे भाकित वर्तविले गेले. तसेच खंडात रक्ताचा पूर वाहणार आणि युध्दजन्य परिस्थिती निर्माण होईल, काही ठिकाणी मोडघड होईल, असे सांगण्यात आले. या धार्मिक कार्यक्रमासाठी पंचक्रोशीतील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. मागील वर्षीचे चळवळीचे भाकित यावर्षी विविध आंदोलने, आरक्षणावरून उद्भवलेल्या वातावरण आणि सोन्याचे भाव याबाबत तंतोतंत खरे ठरले.



तसेच मागील वर्षी लक्ष्मीला पीडा असल्याचे सांगितले गेले होते, त्यानुसार यावर्षी मोठ्या प्रमाणात पाऊस पडून शेतीचे नुकसान झालेले आहे. भक्त नामदेव भुसारे यांनी होईक सांगताना पुढील वर्षी येणाऱ्या संकटाचे स्पष्टीकरण दिले. गावात पशुहत्या बंदीचे पालन करून देवाला भाजी-भाकरीचे नैवद्य दाखविले गेले. सकाळी बिरोबाच्या ओव्या सादर केल्या गेल्या. भुसारे यांनी स्वत:च्या अंगावर वेताचे फटके ओढून होईक सांगितले. ते म्हणाले की, लक्ष्मीला पिडा असल्याने पशुधन आणि शेतीला नुकसान होणार आहे, तर बाळांना या वर्षी संकट नाही. काही ठिकाणी पाऊस पडेल, काही ठिकाणी नाही. दिवाळीच्या सुमारास अडीच ते पाच दिवस पाऊस होईल.

पिकांना रोगराई, गहू, हरभऱ्याची पेर मनभाव, ज्वारीस अपकार होईल असेही सांगितले. ग्रामपंचायत सदस्य व सामाजिक कार्यकर्ते नाना डोंगरे, नामदेव जाधव, बाबासाहेब जाधव, गोकुळ जाधव, साहेबराव बोडखे, सागर कापसे, बबन कापसे, बाबा जाधव, बाबा पुंड, अंशाबापू शिंदे, संजय डोंगरे, संजय कापसे, ठकाराम शिंदे, बाळू भुसारे, युवराज भुसारे, पांडुरंग गुंजाळ, राजू भुसारे, अंबादास निकम, कचरु कापसे आदी उपस्थित होते. पंचक्रोशीतील भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

# मिखायल पाडळे यांचे निधन



**नेवासा । रयत समाचार**

सोनई ता. नेवासा येथील सामाजिक कार्यकर्ते मिखायल शामूवेल पाडळे वय ६९ यांचे अल्पशा आजाराने नुकतेच निधन झाले.

त्यांच्या पश्चात चार भाऊ, तीन मुले, सुना,नातवंडे असा परिवार आहे. रंगश्री पेंटिंग कॉन्ट्रॅक्टरचे संचालक सुनील पाडळे, संदीप पाडळे व सुहास पाडळे यांचे ते वडील होत. त्यांच्या ह्या अचानक निधनाने सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.

## मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी ओंकार ग्रुपकडून १ कोटीची मदत



**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

साखर उद्योगात शुन्यातून विश्व निर्माण करणारे बाबुराव बोत्रे यांच्या ओंकार ग्रुपने पुरग्रस्त शेतकऱ्यांसाठी मदत व्हावी या भावनेने मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी १ कोटी रुपये मदत दिली. मदतीचा धनादेश ओंकार ग्रुपचे चेअरमन बाबुराव बोत्रे, संचालिका रेखा बोत्रे आणि संचालक ओमराजे बोत्रे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्याकडे सुपुर्त केला. या वेळी पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे, शिक्षण मंत्री दादा भुसे आणि आमदार संभाजीराव निलंगेकर व यामिनी पाटील उपस्थित होते. बाबुराव बोत्रे म्हणाले, ‘‘शेतकरी हा आपल्या देशाचा कणा आहे, परंतु अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे प्रपंच उध्वस्त झाले आहेत. शासनाने अशा शेतकऱ्यांना मदत केली, आणि या मदतीत ओंकार ग्रुपचा सहभाग राहावा, तसेच पुरग्रस्त शेतकऱ्यांच्या जीवनात पुन्हा प्रगतीचा दिपोत्सव साजरा व्हावा, या भावनेने आम्ही कर्तव्य बजावले आहे.’’ त्यांनी असेही सांगितले की, ओंकार ग्रुपने शिक्षण, आरोग्य, रोजगार निर्मिती आणि ग्रामीण भागातील पायाभूत सुविधा यांसारख्या क्षेत्रांमध्ये अनेक सामाजिक उपक्रम राबविले आहेत.

# महिलांच्या आर्थिक सबलीकरणाची नवी ज्योत

## महिला बचत गटांना २ कोटी ६१ लाख रुपयांचे कर्जवितरण



**कोपरगाव । रयत समाचार**

माजी आमदार स्नेहलता कोल्हे यांच्या वाढदिवसानिमित्त समाजोपयोगी उपक्रमांचा वारसा जपत संजीवनी स्वयंसहायता महिला बचत गटांना तब्बल २ कोटी ६१ लाख रुपयांचे कर्जवितरण करण्यात आले.

या अर्थपूर्ण उपक्रमाद्वारे महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाचा आणि ग्रामीण विकासाच्या नव्या युगाचा प्रारंभ झाला आहे. संजीवनी उद्योग समूहाच्या सामाजिक बांधिलकीतून राबविण्यात आलेल्या या उपक्रमामुळे शेकडो महिलांना व्यवसाय विस्तार, आर्थिक स्थैर्य आणि स्वावलंबनाचा नवा आधार लाभणार आहे. ग्रामीण भागातील महिला उद्योजकतेला चालना देत स्वयंरोजगाराच्या संधींना बळकटी देण्यासाठी हा कर्जवितरण कार्यक्रम आयोजित करण्यात आला. स्नेहलता कोल्हे यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, ‘‘इतर कोणत्याही क्षेत्रात काम करताना मिळणाऱ्या आनंदापेक्षा महिलांना स्वावलंबी करताना मिळणारे समाधान अधिक मोठे असते. माझ्या सामाजिक आणि राजकीय वाटचालीची जडणघडण महिला बचत गट चळवळीतून झाली आहे. त्यामुळे या दिवशी महिलांच्या हातात आर्थिक स्वावलंबनाची नवी ज्योत पेटविण्याचा आनंद विशेष आहे.‘‘ त्यांच्या कार्यकाळात महिला बचत गट चळवळीला बळकटी देत महिलांच्या आत्मनिर्भरतेचा वसा जोपासला गेला आहे. महिलांना केवळ आर्थिक नव्हे तर सामाजिक बळ देण्याच्या त्यांच्या प्रयत्नांमुळे अनेक महिलांना नवजीवन लाभले आहे. या उपक्रमामुळे महिलांमध्ये आत्मविश्वास वाढून ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवा वेग मिळणार असल्याचे सर्व स्तरांतून व्यक्त करण्यात आले. स्नेहलता कोल्हे यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित या सामाजिक कार्याने त्यांचा वाढदिवस अधिक अर्थपूर्ण आणि जनहितकारी ठरला. मतदारसंघातील हजारो नागरिक, पदाधिकारी, कार्यकर्ते व मान्यवर यांनी त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देत सत्कार केला.

# आखातातील संघर्षाची दोन वर्ष

दोन वर्षापूर्वी म्हणजे ७ ऑक्टोबर २०२३ रोजी हमासने इस्राईलवर हल्ला करून इस्राईलच्या १२०० हून अधिक नागरिकांची हत्या करून २५१ नागरिकांचे अपहरण केले होते. हमासच्या या हल्ल्याला प्रतिउत्तर म्हणून इस्राईलने गाझा पट्टीवर हल्ला करून गाझा पट्टी अक्षरशः जमीनदोस्त केली. इस्राईल ने केलेल्या गाझापट्टीतील २३ लाख लोकसंख्येपैकी जवळपास सर्व लोक विस्थापित झाले आहेत. गाझात अन्न पाणी आणि सुविधांचा प्रचंड तुटवडा निर्माण झाला आहे. गाझा पट्टीत मदत साहित्य पोहचवण्यास ही इस्राईल बाधा आणत आहे. गाझापट्टीत प्रचंड उपासमार निर्माण झाली आहे. उपासमारीनेहजारो मुले कुपोषणग्रस्त झाली आहेत. गेल्या दोन वर्षात इस्राईलने केलेल्या हल्ल्यात पॅलेस्टाइनचे ६४ हजारांहून अधिक नागरिकांचा मृत्यू झाला असून त्यात १८ हजारांहून अधिक मुले आहे. या युद्धात इस्रायलने हमासचे २० हजारांहून अधिक दहशतवादी ठार केले आहेत. इस्राईलच्या हल्ल्यात गाझापट्टीत जखमी झालेल्या लोकांची संख्या दर महिन्याला सरासरी ६८०० इतकी वाढत आहे. या युद्धात इस्राईलचे हजारो नागरिक जखमी झाले आहेत. इस्राईलच्याही अनेक शहरांना हमासने टार्गेट केल्याने इस्राईलचीही दुरवस्था झाली आहे. इस्राईल – हमास युद्धाला आज दोन वर्ष पूर्ण झाली तरीही त्यांच्यातील संघर्ष संपलेला नाही. मागील वर्षी ८ ऑक्टोबर रोजी म्हणजे इस्राईल – हमास युद्धाला १ वर्ष पूर्ण होत असतानाच इस्राईलने लेबनॉनवर हल्ला केला होता. इस्राईलने लेबनॉनवर केलेल्या हल्ल्यात लेबनॉन मधील हिजाबुल्ला या दहशतवादी संघटनेचा प्रमुख असलेल्या हसन नसरुल्ला हा ठार झाला होता. त्या अगोदर इस्राईलने लेबनॉनवर पेजर आणि वोकिटॉकी हल्ला केला होता. इस्राईलने लेबनॉनवर हल्ला करण्यामागचे कारण म्हणजे लेबनॉन हमासला करीत असलेले आर्थिक आणि लष्करी सहाय्य. लेबनॉन मधील हिजबुल्ले इस्राईल – हमास युद्धात हमासला आर्थिक आणि लष्करी सहाय्य पुरवत होते इतकेच नाही तर काही हिजबुल्ले प्रत्यक्ष युद्धातही सहभागी झाले होते त्यामुळे त्यांना धडा शिकवण्यासाठी इस्राईलने लेबनॉनवर हल्ला करून हीजबुल्लाना लक्ष केले होते. इस्राईल – हमास नंतर इस्राईल – लेबनॉन संघर्षाने जग चिंतेत पडले असतानाच या संघर्षात इराणने उडी घेऊन संघर्षाची व्याप्ती आणखी वाढवली. फक्त संघर्षाची व्याप्ती वाढवली नाही तर जगाची चिंताही वाढवली होती कारण इराण हा अरब देशातील किंबहुना इस्लामिक देशातील सर्वात मोठा आणि महत्त्वाचा देश आहे. इस्राईल हमास युद्धात इराणने अपेक्षित उडी घेतल्याने हा संघर्ष आणखी वाढणार हे स्पष्ट झाले. इस्राईल हमास युद्धात इराणने अपेक्षित उडी घेतली. इराणने इस्राईल हमास युद्धात उडी घेतल्याने इस्राईल आणि इराण यांच्यात युद्धाचा भडका उडाला. या युद्धात ही दोन्ही बाजूंनी मोठी वित्त आणि मनुष्य हानी झाली. या दोन देशाला तर युद्धाचा मोठा इतिहास आहे. १९८० सालच्या दशकात तर या दोन देशात कायम युद्धाच्या ठिणग्या पडत होत्या त्यामुळे या युद्धात इराण केंव्हाही उडी घेईल असे म्हंटले जात होते ते खरे ठरवत इराणने इस्राईलवर हल्ला करीत २०० हून अधिक क्षेपणास्त्रे डागली होती. अर्थात इस्राईलने या हल्ल्याचा यशस्वी बचाव केला. यात इस्राईलची म्हणावी तशी हानी झाली नसली तरी या हल्ल्याचा बदला घेतला जाईल असा इशारा इस्राईलने दिला आहे. हा इशारा खरा ठरवत इस्राईलने इराणवर क्षेपणास्त्रांचा मोठा हल्ला केला. हे युद्ध शिगेला पोहचले असताना अमेरिकेने मध्यस्ती केल्याने या युद्धाला काही काळ पूर्ण विराम मिळाला. या दोन्ही देशातील युद्ध काही काळ थांबले पण ते कायमस्वरूपी थांबले असे नाही. या दोन्ही देशात पुन्हा युद्धाला तोंड फुटू शकते. केवळ याच दोन देशातच नाही तर इस्राईल आणि त्यांच्या शेजारी असलेल्या अन्य मुस्लिम देशात युद्ध पेटू शकते. इस्राईल आणि अरब राष्ट्रातील या संघर्षाने जग दोन गटात विभागले गेले आहे. अमेरिका आणि युरोपातील काही देशांनी इस्राईलला पाठींबा दिला आहे तर जगातील मुस्लिम राष्ट्रे आणि युरोपातील काही राष्ट्रे अरब राष्ट्रांच्या पाठीशी उभी आहेत. अमेरिकेने इस्राईलला उघडपणे पाठिंबा दिल्याने इराणसह अन्य अरब राष्ट्रे इस्राईल प्रमाणे अमेरिकेलाही आपला शत्रू मानू लागली आहेत. अमेरिकेने आजवर प्रत्यक्ष युद्धात उतरून इस्राईलला साथ दिलेली नाही मात्र डोनाल्ड ट्रम्प हे विक्षिप्त आहेत. त्यांच्या मनात आले तर ते इस्राईलच्या बाजूने प्रत्यक्ष मैदानात उतरू शकतात आणि जर तसे झाले तर आजवर या युद्धात तटस्थ राहिलेले इजिप्त, जॉर्डन, सीरिया, सौदी अरेबिया, संयुक्त अरब अमिराती हे अरब राष्ट्रे इराणला साथ देण्यासाठी मैदानात उतरील आणि जर तसे झाले तर ती तिसऱ्या महायुद्धाची सुरुवात ठरेल म्हणूनच हा संघर्ष आणखी वाढू न देण्याची खबरदारी जगाने घ्यायला हवी.



श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५


**समाजसंवाद**

# नगरपरिषदेची आरक्षण सोडत जाहीर

## महिला उमेदवारांना मोठी संधी

**शेवगाव । लक्ष्मण मडके**

शेवगाव नगरपरिषदेच्या आगामी निवडणुकीसाठी आरक्षण सोडत जाहीर झाली असून, एकूण १२ प्रभागांमध्ये महिलांना व अनुसूचित जाती प्रवर्गाला विशेष संधी मिळाली आहे. विविध प्रभागांमध्ये 'सर्वसाधारण महिला', 'अनु.जाती महिला' तसेच 'नगरपरिषद राखीव' अशी विविध आरक्षणे निश्चित करण्यात आली. राजकीय वर्तुळात आता चर्चांना वेग आला असून, संभाव्य उमेदवारांमध्ये उत्सुकतेचे वातावरण आहे.



**प्रभागनिहाय आरक्षण पुढीलप्रमाणे:**

१) अ) अनु. जाती (सर्वसाधारण), ब) सर्वसाधारण (स्त्री), २) अ) ना.पा (स्त्री), ब) सर्वसाधारण, ३) अ) सर्वसाधारण (ना.पा), ब) खुला महिला ४) अ) ना.पा (स्त्री), ब) सर्वसाधारण (खुला), ५) अ)अनु. जाती (सर्वसाधारण), ब) सर्वसाधारण (खुला स्त्री), ६) अ) सर्वसाधारण (ना.पा), ब) खुला महिला, ७) अ) सर्वसाधारण (स्त्री), ब) सर्वसाधारण, ८) अ) सर्वसाधारण (ना.पा), ब) सर्वसाधारण (स्त्री) ९) अ) अनु. जाती (महिला), ब) सर्वसाधारण, १०) अ) अनु. जाती (महिला), ब) सर्वसाधारण, ११) अ) सर्वसाधारण (महिला), ब) सर्वसाधारण (खुला), १२) अ) सर्वसाधारण (ना. पा), ब) सर्वसाधारण (स्त्री) 'आरक्षण सोडतीनंतर राजकीय तापमान वाढले असून सर्वच पक्ष संभाव्य उमेदवारांच्या शोधात सक्रिय झाले आहेत.'

# डॉ. प्रेमकुमार भट्टड यांना राज्यस्तरीय जीवन गौरव पुरस्कार



**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

महाराष्ट्र राज्य ऑप्थॉलमिक सोसायटीच्या वतीने दिला जाणारा राज्यस्तरीय जीवन गौरव पुरस्कार दौंड येथील सुप्रसिद्ध नेत्रतज्ज्ञ डॉ. प्रेमकुमार भट्टड यांना नुकताच गोवा येथे आयोजित कार्यक्रमात जेष्ठ नेत्रतज्ज्ञ, पद्मश्री डॉ. तात्यासाहेब लहाने यांच्या शुभहस्ते प्रदान करण्यात आला. डॉ. भट्टड यांनी आपल्या व्यवसायाबरोबरच सामाजिक बांधिलकी जपत ५०० हून अधिक दृष्टीहीन व्यक्तींना नवीन दृष्टी देण्याचे महान कार्य केले. त्यांनी अनेक ठिकाणी नेत्र तपासणी शिबीरांचे आयोजन करून आजपर्यंत हजारो रुग्णांची तपासणी केली. ग्रामीण भागातील लोकांना, शाळा व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना डोळ्यांची काळजी घेण्याबाबत आणि योग्य वेळी योग्य आहार घेण्याबाबत देखील मार्गदर्शन केले आहे. डॉ. भट्टड नियमितपणे संत तुकाराम महाराज आषाढी पंढरपूर वारीतील वारकऱ्यांची सेवा करत असतात. त्यांनी खेड्यापाड्यात जाऊन नेत्रदान चळवळीची सुरुवात केली, ज्यामुळे अनेकांना दृष्टी मिळाली. या सर्वच कार्याची दखल घेऊन त्यांची राज्यस्तरीय जीवन गौरव पुरस्कारासाठी निवड झाली आहे. त्यांच्या या दैदिप्यमान कामगिरीबद्दल दौंड शहर, तालुका तसेच पुणे आणि अहिल्यानगर जिल्ह्यातील अनेकांनी त्यांना भेटून कौतुक व अभिनंदन केले आहे.

# विभागीय तायक्वांदो स्पर्धेत प्रांजल पोटे हिला सुवर्ण पदक

**अहमदनगर । रयत समाचार**

केडगाव येथील सरस्वती विद्यालयाच्या खेळाडू प्रांजल पोटे हिने पुणे येथे झालेल्या विभागीय तायक्वांदो स्पर्धेत सुवर्ण पदक मिळवले आहे. तिचे छत्रपती संभाजीनगर येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड करण्यात आलेली आहे. या यशाबद्दल विद्यालयाचे अध्यक्ष, सचिव, व्यवस्थापन समिती व शिक्षक मंडळींनी तिचे अभिनंदन केले व पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. मुख्याध्यापक म्हणाले की प्रांजलच्या यशामुळे विद्यालयाचे व जिल्ह्याचे नाव उज्ज्वल झाले आहे. विद्यालय कठोर परिश्रम, सातत्य, शिस्त आणि आत्मविश्वासातून विद्यार्थ्यांना क्रीडा, संस्कृती व सर्वांगीण विकासासाठी प्रोत्साहित करत आहे.



# प्रेमध्वज मिरवणुकीसह पंत महाराज पुण्यतिथी उत्सवाला प्रारंभ

**बेळगाव । श्रीकांत काकतीकर**

कर्नाटक व महाराष्ट्रातील हजारो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री क्षेत्र पंत बाळेकुंद्री येथे बुधवार, ता. ८ ऑक्टोबरपासून श्री पंत महाराज बाळेकुंद्री यांचा १२०वा पुण्यतिथी सोहळा प्रारंभ झाला. या सोहळ्याचे आयोजन श्री दत्त संस्थान वतीने जय्यत करण्यात आले असून, सलग तीन दिवस विविध कार्यक्रमांचे आयोजन आहे. सोहळ्याच्या पहिल्या दिवशी सकाळी ८ वाजता श्रीपंत वाडा, समादेवी गल्ली, बेळगाव येथून प्रेमध्वज मिरवणूक निघाली. मिरवणूक बेळगाव शहरातून मार्गक्रमण करत सांबरा रोड मार्गे दुपारी २ वाजेपर्यंत श्री पंत बाळेकुंद्री वाड्यापर्यंत पोहोचेल. सायंकाळी ५ वाजता प्रेमध्वज मिरवणूक पुन्हा सुरू होऊन रात्री ८ वाजता प्रेमध्वजारोहण करून उत्सवाला औपचारिक प्रारंभ होईल. उद्या गुरुवार, ता. ९ ऑक्टोबर रोजी पहाटे ५ वाजता श्रींचा पुण्यस्मरण कार्यक्रम होईल. सकाळी ७ वाजता श्रींची पालखी वाड्यातून समारंभाने निघून दोन प्रहरी आमराईतील श्रीपंत स्थानी पोहोचेल. रात्री ८ ते १२ वाजेपर्यंत पालखी सेवा पार पडेल. शुक्रवार, ता. १० ऑक्टोबर रोजी दुपारी १२ वाजता महाप्रसाद, दुपारी ३ ते ५ वाजता प्रेमानंद टिपरी कार्यक्रम होईल. सायंकाळी ६ वाजता पालखी अमराईतील पूज्य स्थानी पोहोचून गावातील वाड्यात परत येईल व उत्सवाची सांगता होईल. पुण्यतिथी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर मंदिर व आमराई परिसरात स्वच्छता, रंगकाम तसेच आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. तीन दिवसांच्या काळात मोठ्या संख्येने येणाऱ्या वाहनांच्या गर्दीला लक्ष देत पार्किंगची व्यवस्था केली आहे. श्री दत्त संस्थान भाविकांना सोहळ्याचा लाभ घेण्याचे आवाहन करते.



# देवस्थानाची सूत्रे पुन्हा ग्रामस्थांकडे द्यावीत– सरपंच बाळासाहेब बानकर

**नेवासा । विजय खंडागळे**

जागतिक स्तरावर भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री क्षेत्र शनिशिंगणापूर देवस्थानाच्या कारभारावरून सुरू असलेल्या वादाच्या पार्श्वभूमीवर हे देवस्थान पूर्वीप्रमाणे पुन्हा ग्रामस्थांकडे द्यावे आणि शासनाने त्यावर प्रशासकीय अधिकारी नेमावा, अशी संतप्त मागणी सरपंच बाळासाहेब बानकर यांनी केली. देवस्थानाच्या विश्वस्त मंडळाबाबत सुरू असलेल्या राजकीय हालचालींवरही त्यांनी नाराजी व्यक्त केली.



पूर्वी जेव्हा विश्वस्त मंडळ नेमले गेले, तेव्हा भाजपचे मुख्यमंत्री, भाजपचे पालकमंत्री आणि भाजपचे नेवासा आमदार होते. आता ते मंडळ बरखास्त करून पुन्हा नव्या तीन पक्षांच्या सरकारकडून त्याच विचारसरणीतील विश्वस्त नेमले जाणार आहेत. मग सरकारने आधीचे मंडळ रद्द करून नेमके काय साध्य केले?'' असा सवाल त्यांनी उपस्थित केला. शनी शिंगणापूर पंचक्रोशीत या विषयावर दबक्या आवाजात चर्चा सुरू असून, अनेकजण शासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत आहेत. देवस्थानात झालेल्या गैरव्यवहारांवरही बानकर यांनी भाष्य केले. ''देवस्थानात कोट्यवधींचे घोटाळे झाले, बोगस भरती, बनावट पावत्या, देणगी गैरवापर यांसारख्या गंभीर तक्रारी समोर आल्या आहेत. या प्रकरणात कारवाई करण्याऐवजी लक्ष दुसरीकडे वळवण्याचा प्रयत्न सुरू आहे की काय, अशी शंका लोकांमध्ये निर्माण झाली आहे,'' असे त्यांनी सांगितले.''गावाला दोषी ठरविणे चुकीचे आहे. आम्ही ठामपणे म्हणतो की दोषींवर कडक कारवाई झालीच पाहिजे. मात्र, असंतोष न पसरवता देवस्थानाची सूत्रे पुन्हा ग्रामस्थांकडे द्यावीत,'' अशी मागणी बाळासाहेब बानकर यांनी केली. तसेच, या विषयावर ते लवकरच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा करणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

# नगरपालिका प्रभाग आरक्षण जाहीर; इच्छुकांचे गणित बदलले




**श्रीरामपूर । सलीमखान पठाण**

श्रीरामपूर नगरपालिकेच्या आगामी निवडणुकीसाठी नगराध्यक्ष पद पूर्व घोषित केल्यावर शहरातील प्रभागानिहाय आरक्षण सोडत काल प्रांत अधिकारी कार्यालयात काढण्यात आले. यामध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागास प्रवर्ग आणि सर्वसाधारण महिला अशा विविध प्रवर्गासाठी जागा निश्चित करण्यात आल्या. प्रांत अधिकारी किरण सावंत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पालिकेचे मुख्याधिकारी मच्छिंद्र घोलप व सहकारी यांनी नियोजनपूर्वक ही सोडत काढली.

नगरपालिकेचे एकूण १७ प्रभाग असून सदस्य संख्या ३४ आहे. अनुसूचित जाती महिला: प्रभाग क्रमांक २,३,१०, अनुसूचित जाती सर्वसाधारण: प्रभाग क्रमांक ७,१२,१४, अनुसूचित जमाती महिला: प्रभाग क्रमांक १३, नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला: ५,८,११,१६,१७, नागरिकांचा मागास प्रवर्ग पुरुष: १,४,६,९, सर्वसाधारण महिला: १,४,६, ७,९,१२,१४,१५, सर्वसाधारण पुरुष: २,३,५,८, १०,११,१३,१५,१६,१७, प्रभाग क्रमांक १५ ही सर्वसाधारण असून येथे एक महिला व एक पुरुष उभे राहू शकतात. काल झालेल्या सोडतीमुळे अनेक इच्छुकांचे गणित बदलले आहे. ज्या भागांमध्ये सर्वसाधारण अपेक्षा होती, तिथे महिला किंवा मागास प्रवर्गाचे आरक्षण पडल्यामुळे काही उमेदवार आता इतर भागात नशीब आजमावण्याच्या तयारीत आहेत. काही प्रभागांमध्ये दोन्ही जागांवर आरक्षण पडल्यामुळे खुल्या प्रवर्गातील इच्छुकांचा हिरमोड झाला आहे. राज्यात महाविकास आघाडी आणि महायुती यांच्यात लढत होणार असून, स्थानिक पातळीवर काही ठिकाणी स्वतंत्र लढण्याची तयारीही दिसून येत आहे. नगराध्यक्ष पद सर्वसाधारण असल्याने या वेळी राजकीय चुरस वाढलेली आहे. प्रत्येक पक्ष आता प्रभागातील उमेदवार निश्चित करून नगरपालिकेची सत्ता मिळविण्याच्या दृष्टीने तयारी करत आहे.

